follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 ✲ वर्ष २६ ✲ अंक ३३८ ✲ शनिवार दि.७ सप्टेंबर २०२४ ✲ पाने ४ ✲ किंमत ५/-



दैनिक राजदंडच्या
असंख्य वाचक, हितचिंतक,
जाहिरातदार यांना
श्री गणेश चतुर्थीच्या
हार्दिक शुभेच्छा!

# विनेश फोगटची उमेदवारी जाहीर

## हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर

हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत काँग्रेसने ३१ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. या यादीनुसार काँग्रेसने विनेश फोगाटला जुलाना मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. तर लाडवा मतदारसंघातून काँग्रेसने मेवा सिंह यांना तिकीट दिलं आहे. त्यांची थेट लढत मुख्यमंत्री नायब सैनी यांच्याशी होणार आहे. माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुड्डा यांना गढी सांपला-किलोई मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय हरियाणा काँग्रेसचे प्रमुख उदयभान यांना होडल मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.



एकीकडे काँग्रेसने ३१ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली असली, तरी दुसरीकडे इंडिया आघाडीतील आप आणि काँग्रेस यांच्यात जागावाटपासून मतभेद असल्याचं पुढे आलं आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आम आदमी पक्षाने हरियाणात ७ जागांची मागणी केली आहे. मात्र, काँग्रेस आपला केवळ तीन-चार जागा देण्यास तयार आहे. याशिवाय काँग्रेसने आपला ज्या जागांचा प्रस्ताव दिला आहे. त्या शहरी भागातील जागा आहे, जिथे भाजपाच मजबूत स्थितीत आहे. त्यामुळे आप आणि काँग्रेस यांच्यात जागा वाटपावरून एकमत होत नसल्याची माहिती आहे.

हरियाणा विधानसभेच्या ९० जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. या ९० जागांसाठी ५ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. आधी ही तारीख १ ऑक्टोबर घोषित करण्यात आली होती. मात्र, नंतर ही तारीख बदलण्यात आली आहे. याशिवाय ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणीही होणार आहे.

### दिल्लीतील बैठकीत ३१ उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब

**उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी दिल्लीत गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसच्या नेत्यांच्या बैठकीचं सत्र सुरू होतं. आजही काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या नेतृत्वात दिल्लीत बैठक पडली. या बैठकीत विनेश फोगाट सह ३१ उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. या बैठकीला काँग्रेस अध्यक्षांसह काँग्रेस नेते राहुल गांधी, सोनिया गांधी, भूपेंद्र सिंह हुड्डा तसेच काँग्रेसचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. महत्त्वाचे म्हणजे विनेश फोगाटने आज काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता.**

## अनंत अंबानींकडून लालबागच्या राजाला २० किलोंचा सोन्याचा मुकूट

**पुणे :** मुंबईतील प्रसिद्ध गणपती लालबागच्या राजाची पहिली झलक सर्वांना पाहायला मिळाली. नवसाला पावणारा अशी ख्याती असलेल्या लालबागच्या राजा मंडळाचे हे ९१ वे वर्ष आहे. लालबाग राजाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी देश-विदेशातील सर्व क्षेत्रातील दिग्गज उपस्थिती लावतात. यंदाचा लालबागचा राजा मयूरासनावर विराजमान आहे. लालबागच्या राजाला रिलायन्स समुहाचे प्रमुख मुकेश अंबानी यांचे धाकटे चिरंजीव अनंत अंबानी यांची मंडळामध्ये मानद सदस्य म्हणून नियुक्ती झाली. अनंत अंबानींनी आपल्या कुटुंबियांकडून लालबागच्या राजाला २० किलो सोन्याचा मुकूट अर्पण केला आहे. या मुकुटाची जोरदार चर्चा होत असलेली पाहायला मिळत आहे.

लालबागच्या राजाची मनमोहक अशी १४ फुटांची बाप्पाची मूर्ती यंदाच्या वर्षी मयूरासनावर विराजमान आहे. लालबागच्या राजाला यंदा मयूर महल केला असून मंडळाचे हे ९१ वे वर्ष आहे. विशेष म्हणजे लालबागच्या राजावर यावर्षी २० किलो सोन्याचा मुकुट पाहायला मिळतोय.

## उत्तरकाशीमध्ये भूस्खलन; दरड कोसळल्याने गंगोत्री महामार्ग बंद

**उत्तराखंड :** राजस्थानमध्ये मुसळधार पावसाने कहर केला. मुसळधार पाऊस हा नागरिकांसाठी आपत्ती ठरत आहे. अशातच उत्तरकाशीतील बंदरकोटजवळ डोंगर कोसळल्याचा एक भयानक व्हिडिओ समोर आला आहे. टेकडीवरून दगड आणि ढिगारा पडत आहेत. पावसामुळे बंदरकोटजवळ खड्डे आणि ढिगारा पडल्याने गंगोत्री महामार्ग ठप्प झाला आहे. त्यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. महामार्ग ठप्प झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना तसेच यात्रेकरूंना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. यमुनोत्री खोऱ्यात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी ढिगारा



आणि खड्डे पडल्याने यमुनोत्री महामार्ग बंद करण्यात आला.

आणि यमुनोत्री मार्ग अनेक ठिकाणी ठप्प झाला आहे. शुक्रवारी सकाळी बंदरकोटजवळ गंगोत्री महामार्ग रोखण्यात आला. येथे टेकडीपासून महामार्गापर्यंत दरड कोसळण्याचे प्रकार सुरू आहेत. सध्या या ठिकाणी महामार्ग उघडण्याची प्रतीक्षा स्थानिक नागरिक व प्रवासी करीत आहेत. टेकडीवरून सतत दगड आणि ढिगारे पडत आहेत. महामार्गावरील ढिगारा हटवून वाहनांची वाहतूक सुरळीत करता यावी यासाठी बीआरओ मशिनद्वारा कामे करण्यात येत आहे.

## गणेशोत्सवात चोख बंदोबस्त; साडे पाच हजार पोलीस असणार तैनात

**पुणे :** वैभवशाली गणेशोत्सवानिमित्ताने शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात असणार असून, तब्बल साडे पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे. शहराच्या मध्यभागाला केंद्रबिंदू मानत बंदोबस्त ठेवला असून, पुढील १० दिवस २४ तास पोलीस रस्त्यांवर तैनात राहून पुणेकरांची सुरक्षा, त्यांना सुविधा देऊन होणारी गैरसोय टाळणार आहेत. यासोबत वाहतूक शाखेचे पोलीस कोंडी टाळण्यासाठी तैनात असतील. त्यांचा स्वतंत्र बंदोबस्त असणार आहे.

पुणे पोलिसांनी गणेशोत्सवानिमित्त जोरदार तयारी केली असून, महत्वाचा भाग तसेच तेथील गणेश मंडळांना भेट देऊन पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी नुकताच पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यासोबत पुर्ण शहराचा आढावा घेत पुढील दहा दिवसांचे नियोजन केले आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखेचे उपायुक्त जी. श्रीधर यांनी या बंदोबस्ताची आखणी केली आहे.

गणेशोत्सवाला ७ सप्टेंबर) सुरूवात होत आहे. उत्सवाच्या काळात संभाव्य घातपाती कारवाया तसेच अनुचित घटनांचा धोका विचारात घेऊन पोलिसांनी शहर तसेच उपनगरात कडेकोट



बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. गर्दी तसेच वाहतूकीचे नियोजन आणि चोऱ्या रोखण्याच्या दृष्टीने देखील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

साडे पाच हजार पोलिसांसोबत होमगार्ड, शीघ्र कृती दल, गुन्हे शाखेची पथके, गृहरक्षक दलाचे जवान, केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या तैनात असणार आहेत. तर पोलीस मित्रांचीही मदत घेतली जाणार आहे. मानाच्या मंडळांसह गर्दीच्या ठिकाणी बॉम्ब शोधक पथक व डॉग स्कॉड २४ तास उपलब्ध असणार आहेत.

## छगन भुजबळ यांचं चॅलेंज जरांगेंनी स्वीकारलं?

## मनोज जरांगे येवल्यातून निवडणूक लढवणार?

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी 'टीव्ही ९ मराठी'च्या महाराष्ट्राचा महासंकल्प कार्यक्रमात मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना जरांगेंना चॅलेंज दिलं. मनोज जरांगे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी सर्व २८८ जागांवर निवडणूक लढवावी आणि येवल्यात स्वत: जरांगेंनी आपल्यासमोर निवडणूक लढावी, असं चॅलेंज छगन भुजबळ यांनी दिलं. भुजबळांच्या या चॅलेंज नंतर आम्ही मनोज जरांगे यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पण मनोज जरांगे यांनी भुजबळांवर फार बोलणं टाळलं. मी छगन भुजबळांना मोजत नाही, असं



मनोज जरांगे म्हणाले. यावेळी जरांगेंनी आमदार राजेंद्र राऊत आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली.

काय करायचं ते जनता ठरवेल. सर्व वेळेवर कळेल. फक्त मराठा आरक्षणाला विरोध करु नको. मी सर्वच नेत्यांना सांगतो, मराठा आरक्षणाला विरोध करु नका. मराठा आरक्षणाला विरोध तर मग कितीही मोठा जहांगीरदार असूद्या, तो गेला म्हणजे गेला. त्याचा पराभव झाला. मी टीव्ही ९ च्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांना सांगतो, पुन्हा चाळे चालू केले ते बंद करा. आम्हाला कधी वाटतं चांगला माणूस आहे. तर कधी वाटतं की, गोड बोलून आमची मान छाटायची काम सुरु केलं का? बार्शीच्या आमदाराला सांगून मराठा विरुद्ध मराठा उभे करत आहेत, असं मनोज जरांगे म्हणाले.

देवेंद्र फडणवीसांनी त्याला पूर्ण बळ दिलं आहे. पण तो निवडणुकीत टिकणार नाही. त्याने मराठ्यांच्या विरोधात जावू नये. तू जा मग तुला मराठे काय आहेत ते कळेल. तू तुझ्या गल्लीपुरता बघू नको की तू आमदार झाला. आमदार राजेंद्र राऊत दादागिरी करायला जाऊ नकोस. देवेंद्र फडणवीस किंवा कुणीही कामाला येत नाही. दादागिरी करायला जाऊ नकोस, महाराष्ट्रात तुझ्यापेक्षा इर ना पीर आहेत. तुला सांगतो, तू आरक्षणाच्या फंद्यात पडू नकोस. देवेंद्र फडणवीसांचं ऐकून मराठे मराठ्यांवर सोडायचं बंद कर. तुला देवेंद्र फडणवीस सांगतात तसं तू करतो. मी फडणवीसांना सांगतो, हे चाळे बंद करा, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं.

मी छगन भुजबळांना मोजत नाही. पण मी देवेंद्र फडणवीस यांना सांगतो, देवेंद्र फडणवीस यांनी जाणीवपूर्वक हा राऊत उभा केला. ही गरिबाची लढाई आहे. एकही मराठा सध्या आरक्षणाच्या आंदोलनाला विरोध करत नाहीत. चिरीमिरी खाणारे आरक्षणाच्या विरोधात बोलत आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या बंगल्यावर आणि आरोग्य मंत्र्यांच्या बंगल्यावर एक बैठक केली आणि तिथे काहीतरी शिजलं आहे. देवेंद्र फडणवीस यांचं स्वप्न कधीच पूर्ण होणार नाही. जर मराठ्यांच्या आंदोलनाला राज्यात धक्का लागला तर राजेंद्र राऊत तुलाच नाही तर फडणवीसांनाही राज्यात फिरु देणार नाही, असा मोठा इशारा मनोज जरांगे यांनी केला.



लालबागच्या राजाची पहिली झलक



दगडूशेठ मंदिराच्या सजावटीसाठी साकारले आशियातील सर्वात उंच जटोली शिवमंदिर

# 'शाळा बंद' घातकच!

गेल्या दीड वर्षांतील 'शाळा बंद'च्या निर्णयामुळे देशाच्या ग्रामीण भागातील ३७ टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला असल्याचा या अहवालाचा निष्कर्ष आहे. तसेच ग्रामीण भागातील केवळ आठ टक्के विद्यार्थ्यांनाच या काळात संगणकाच्या साह्याने दिल्या जाणाऱ्या 'ऑनलाइन' अभ्यासात सहभागी होता आले. शहरी भागात हे प्रमाण २४ टक्के इतके आहे. कोरोनाकाळात शाळा प्रत्यक्षात बंद राहिल्या, तरी मुलांना संगणकाच्या आधारे शिक्षण देण्याच्या या योजनेचा राज्यकर्त्यांच्या अदूरदृष्टीमुळे किती फज्जा उडाला आहे, हे यावरून स्पष्ट होते. या पाहणीसाठी आसाम, बिहार, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, प. बंगाल यांसारख्या १५ राज्यांतील शहरी आणि ग्रामीण भागांतील विद्यार्थी आणि पालक यांची भेट घेण्यात आली. या नव्या आभासी शैक्षणिक वातावरणात नियमितपणे शाळेत 'उपस्थित' राहणाऱ्या शहरी विद्यार्थ्यांची टक्केवारी २४ आहे, तर ग्रामीण भागात हे प्रमाण फक्त आठ टक्के आहे. याचे कारण ग्रामीण भागातील किमान ५० टक्के घरांमध्ये आधुनिक मोबाइल फोन नाहीत. त्याहून काळजीचे कारण म्हणजे दलित आणि आदिवासी मुलांपैकी केवळ पाच टक्के मुले शिक्षण घेऊ शकली. घरात स्मार्टफोन असलाच तरी त्याचा वापर मुख्यत्वे घरातील मोठ्या व्यक्ती करतात, त्यामुळे या मुलांच्या हाती तो येणे दुरापास्त असते. यातून शिक्षण आणि विद्यार्थी यांचे नाते या काळात जवळजवळ संपुष्टात आले आहे. शहरी भागातील ५१ तर ग्रामीण भागातील ५८ टक्के विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची भेटच झाली नसल्याने विषय समजून घेण्यातील अडचणींमध्ये भर पडली आहे. काही शिक्षकांनी अधिक कष्ट घेऊन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केल्याची नोंद हा अहवाल करतो. तसेच गेल्या १७ महिन्यांत शाळा बंद राहिल्याने मुलांच्या आरोग्यावर झालेला परिणामही असाच गंभीर आहे. या काळात माध्यान्ह भोजनास मुकलेल्या या मुलांच्या आरोग्याचे प्रश्न त्यामुळे अधिकच वाढलेले दिसतात. ही योजना सुरू झाली, तेव्हा मुलांना जीवनावश्यक वस्तूंचा शिधा मिळत असे. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाच्याच रोटीचा प्रश्न काही अंशी तरी सुटत असे. मात्र आपल्या व्यवस्थेतील भ्रष्टाचाराने ही योजना पोखरून टाकली आणि मुलांना शाळेतच शिजवलेले अन्न देण्याचा निर्णय न्यायालयाला घ्यावा लागला. परिणामी मुले शाळेत जेवू लागली, मात्र घरातील बाकीचे उपाशीच राहू लागले. घरातील मुलींना निदान या एका कारणासाठी तरी शाळेत पाठवण्याचा पालकांचा हट्टही त्यामुळे कमी होत गेला. त्यासाठी पुन्हा नव्याने प्रयत्न करून मुलींचा टक्का वाढवण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागले. शाळा सुरू झाल्या पाहिजेत, असे वाटणाऱ्या पालकांची संख्या या अहवालानुसार सणसणीत ९७ टक्के इतकी आहे. पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठवण्यास तयार आहेत, मात्र शासनकर्त्यांना शाळा बंदच राहणे अधिक योग्य वाटत आले आहे. औद्योगिक तंत्रज्ञान संस्थांमधील विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्या मोठ्या प्रमाणावर घटल्याचे वृत्त याचे निदर्शक. पहिल्या फेरीतच या अभ्यासक्रमासाठी, मागील वर्षांपेक्षा सुमारे ४५ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे नाकारले. अनेक विषयांतील पदविका अभ्यासक्रमांकडेही विद्यार्थ्यांनी पाठ फिरवलेली दिसते. हे धोकादायकच. शाळेत जाणे म्हणजे केवळ अभ्यास करणे, एवढेच नसते. त्याचा मुलांच्या सामाजिक विकासावरही मोठा परिणाम होत असतो, असे मानसोपचारतज्ज्ञ सांगत आले आहेत. सवंगड्यांबरोबर दीर्घकाळ संवाद नसणे हे त्यांच्या मनावर परिणाम करणारे असते. मित्र, गप्पा, अभ्यासाची देवाणघेवाण या गोष्टी मुलांच्या समाजातील अडीअडचणी समजून घेऊन स्वतःला परिस्थितीशी जुळवून घेण्याचे शिक्षण देणाऱ्या असतात. प्राप्त स्थितीत हे सर्व नाकारले जात असल्याने मुलांच्या मानसिक स्वास्थ्यावर त्याचा गंभीर परिणाम होताना दिसतो. सहजीवनातून मिळणारे हे शिक्षण किती महत्त्वाचे असते, याचा दाखला अझीम प्रेमजी फाऊंडेशनने केलेल्या अन्य सर्वेक्षणातूनही पुढे आला. यानुसार ९२ टक्के मुलांच्या भाषाकौशल्यावर करोनाकाळातील शाळाबंदीचा तीव्र परिणाम झाला असून ८२ टक्के मुले तर गणित या विषयापासून लांब अंतरावर राहिली आहेत, असे या अहवालाचे निष्कर्ष असून राज्यांपुढे ही नवी आणीबाणी येऊ घातल्याचा इशारा देण्यात आला आहे. पुढील १५ वर्षांत तरुण वयात पदार्पण करणाऱ्यांना अव्यवस्थित शिक्षण, आर्थिक आघाडीवरील अडचणी, विविध कौशल्यांचा अभाव यांसारख्या भयंकर अडचणींचा सामना करावा लागेल. जेव्हा मुले 'हाताशी' येतात, तेव्हाच ती बाजारपेठेसाठी आवश्यक असणारी कौशल्ये अंगी बाणवून उभी राहणे महत्त्वाचे असते. ते कसे होईल, याची चिंता ज्यांना असायला हवी, त्यांनी त्याकडे तातडीने लक्ष पुरवणे आवश्यक आहे. जगातील अनेक देशांनी करोनाकाळातही शाळा सुरू करण्याचे धाडस दाखवले. त्यासाठी अनेक कल्पना अस्तित्वात आणल्या. मोठी गुंतवणूकही केली. भारतात मात्र करोनाच्या पुढील लाटेच्या भीतीने ग्रस्त असलेल्या राज्यकर्त्यांना सर्वात आधी शाळा बंद ठेवण्यात रस! हे चित्र त्वरेने बदलण्यासाठी केवळ शिक्षणतज्ज्ञ आणि पालकांचा रेटा हवा आणि आहे तो वाढायला हवा. शैक्षणिक समस्येचा कसलाही गंध नसलेल्या आपल्या राजकीय पक्षांस मंदिरे कधी उघडली जाणार याची चिंता आहे. त्यासाठी मंदिरांसमोर घंटानाद आंदोलने सुरू आहेत. पण यातील एकाही राजकीय पक्षास शाळांत वाजणाऱ्या घंटेची काहीही फिकीर नाही. हे असे शिक्षणदुष्ट राजकारण हे शैक्षणिक प्रगती साधण्यातील करोनापेक्षा मोठे आव्हान आहे. पक्षनिरपेक्ष विचार करू शकणाऱ्या सुज्ञ जनतेचा रेटाच त्यावर मात करू शकेल. समाजातील काही शहाण्यांनी यासाठी पुढाकार घेतल्यास 'लोकसत्ता' सर्वार्थाने त्यात सहभागी होईल. शारीरिक आरोग्य महत्त्वाचे खरेच. पण बौद्धिक आरोग्याशिवायची शारीरिक तंदुरुस्ती विनाशाकडे नेणारी असेल. या अहवालांचे

# पंतप्रधान मागणार कशा कशाची माफी?

## राहुल गांधी यांनी मांडली कारणांची यादी

**सांगली :** मालवणच्या राजकोट किल्ल्यात केवळ आठ महिन्यातच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ढासळला, याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ महाराजांची माफी मागणे पुरेसे नाही तर त्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक जणांची माफी मागितली पाहिजे, असे प्रतिपादन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केले.

काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचे अनावरण झाल्यानंतर सभेला संबोधित करताना राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सरकारला धारेवर धरले. पंतप्रधानांनी कशा कशाची माफी मागितली पाहिजे, याची यादीच त्यांनी मांडून दाखवली.

मोदी यांनी नेमकी कशाबद्दल माफी मागितली, हे स्पष्ट झालेले नाही. ज्याच्या हातून चूक होते तोच माफी मागत असतो. कदाचित शिवछत्रपतींची मूर्ती घडविण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित व्यक्तीला दिले. ते गुणवत्ता असलेल्या सक्षम शिल्पकाराला द्यायला हवे होते, या जाणिवेतून मोदी यांनी माफी मागितली असेल. दुसरे कारण म्हणजे या पुतळा उभारणीच्या कामात भ्रष्टाचार किंवा चोऱ्यामाऱ्या झाल्याचे त्यांच्या लक्षात आले असेल किंवा शिवछत्रपतींचा पुतळा उभारल्यानंतर आठ महिने देखील उभा राहू शकला नाही, हे त्यांच्या माफी मागण्याचे तिसरे कारण असू शकेल, असे राहुल गांधी म्हणाले.

तुम्ही उभा केलेला पतंगराव कदम यांचा पुतळा मात्र, दीर्घकाळ उभा राहील, असा विश्वास व्यक्त करतानाच राहुल गांधी यांनी कदम यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कदम यांनी कायम महाराष्ट्राचा विचार केला. राज्याचा विकास केला आणि शिक्षण क्षेत्रात सेवा केली. ते आयुष्यभर काँग्रेसशी एकनिष्ठ राहिले. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा पराभव झाल्यानंतर सुद्धा कदम हे ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले, असे गांधी यांनी नमूद केले.

**... या कारणांसाठी ही मागा देशाची माफी**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक चुका केल्या. नोटबंदीचा निर्णय चुकीचा निर्णय होता. वस्तू व सेवा कर ज्या पद्धतीने आणला ती पद्धतही चुकीची होती. अशा सगळ्या चुकांबद्दल त्यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणी देखील राहुल गांधी यांनी केली. हे सरकार केवळ दोन लोकांसाठी चालले आहे. कोणतेही मोठे काम हे केवळ अंबानी किंवा अदानी यांनाच मिळते, असा आरोपही त्यांनी केला.

महाराष्ट्रातील महापुरुषांनी दिली देशाला प्रेरणा

महाराष्ट्र हे विकसित राज्य आहे. या राज्याला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी विचार दिला. या महापुरुषांनी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला प्रेरणा दिली, अशा शब्दात राहुल गांधी यांनी या महापुरुषांबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

शिवछत्रपतींनी जी विचारसरणी रुजवली तीच आमची विचारसरणी आहे. आमच्या नसानसात विचारसरणी आहे. सध्या दोन विचारसरणीमध्ये युद्ध सुरू आहे. एका बाजूला महापुरुषांचे विचार आहेत तर दुसऱ्या बाजूला भारतीय जनता पक्ष आहे. आम्हाला सर्वांना घेऊन पुढे जायचे आहे तर त्यांना निवडक लोकांनाच फायदे लुटू द्यायचे आहेत, मागासांनी मागासच रहावे, दलितांनी दलितच राहावे, अशी त्यांची इच्छा आहे. सगळ्या महत्त्वाच्या ठिकाणी त्यांना त्यांची माणसं बसवायची आहेत, अशी टीकाही गांधी यांनी केली.

**भाजपचे राजकारण विद्वेषाचे**

भाजपचे राजकारण हे विद्वेषाचे राजकारण आहे. भाजप धर्माधर्मांमध्ये, जाती जातींमध्ये, प्रांता प्रांतांमध्ये विद्वेष निर्माण करीत आहे, असा आरोपही राहुल गांधी यांनी केला. तब्बल दीड वर्षापासून मणिपूर पेटलेले आहे. मात्र, पंतप्रधान त्या ठिकाणी गेले नाहीत. कारण ती आग भाजपच्या लोकांनीच लावलेली आहे, असेही ते म्हणाले.

# राजकीय पक्षांचा गुंतवणूकदारांना पाठिंबा

**पुणे :** डी एस कुलकर्णी यांच्या कंपन्यात ठेवी बुडलेल्या गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देण्यासाठी स्थापन झालेल्या चैतन्य सेवाभावी संस्था (असोसिएशन ऑफ डीएसके फ्रॉड व्हिक्टिम्स) ने हिंदू महासंघाच्या सहकार्याने मेळाव्याचे आयोजन केले होते. दि ६ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता श्रमिक पत्रकार संघ सभागृह येथे हा मेळावा झाला. हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे, राष्ट्रवादी पक्ष (शरदचंद्र पवार )चे शहराध्यक्ष प्रशांत जगताप , शिवसेना(उध्दव ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक पृथ्वीराज सुतार,एकनाथ शिंदे गटाचे प्रवक्ते अभिजित बोराटे उपस्थित राहिले. त्यातून राजकीय पक्षांचा गुंतवणूकदारांना पाठिंबा मिळाला. पुढील आक्रमक आंदोलनाची दिशा जाहीर करण्यात आली .

'डीएसके प्रकरणात सर्व यंत्रणा कडून सर्वसामान्य व्यक्तींना गृहित



धरले जात आहे.आपलेच पैसे मिळविण्यासाठी गुंतवणूकदारांना यातायात करावी लागते. राजकीय पक्षांनी गुंतवणूकदारांना न्याय देण्यासाठी हालचाली केल्या नाहीत तर गणेशोत्सवानंतर सर्व राजकिय पक्षांच्या कार्यक्रमांना काळे झेंडे घेऊन उपस्थित राहून गुंतवणूककार हा मुद्दा मांडतील. चर्चा झाल्याशिवाय हे गुंतवणूकदार सभास्थान सोडणार नाहीत.जे पक्ष आज गुंतवणूकदारांच्या व्यथा ऐकायला आले नाहीत, त्यांची यादी लक्षात ठेवली पाहिजे.

# भीमाशंकर कारखान्याच्या सभेत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटात राडा

आंबेगाव: भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि अजित पवार गटाचे कार्यकर्ते आमनेसामने आले आणि मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या समोरच त्यांच्यात राडा झाला. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

आंबेगाव तालुक्यातील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेसाठी अजित पवार गटाचे ज्येष्ठ मंत्री दिलीप वळसे पाटील आणि त्यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी सज्ज असलेले शरद पवार गटाचे देवदत्त निकम यांचे कार्यकर्ते समोरासमोर आले.

वळसे पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी निकम यांच्या कार्यकर्त्यांना बसण्यासाठी खुर्च्या दिल्या नाहीत. शरद पवार गटाच्या नेत्यांना मंचावर येऊ दिले नाही, असे आरोप करत दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. एकमेकांच्या अंगावर धावून गेले. काहींनी तर एकमेकांवर खुर्च्या ह उगारल्या. खुद्द वळसे पाटील यांनी शांततेचे आवाहन करूनही संतप्त कार्यकर्त्यांनी त्यांना जुमानले नाही. हा राडा तब्बल दोन तास सुरूच होता. अखेर पोलिसांनी मध्यस्थी करून देवदत्त निकम यांना त्यांच्या कार्यकर्त्यांना बाहेर घेऊन जाण्याची विनंती केली. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली.

कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत आपल्या कार्यकर्त्यांना स्थान देण्यात आले नाही. उलट सभास्थानी आलेल्या कार्यकर्त्यांना हाकलून लावण्यासाठी गुंड मागवण्यात आले होते. कारखान्याच्या सभेच्या निमित्ताने वळसे पाटील यांनी स्वतःचा प्रचार करून घेतला, असे आरोप देवदत्त निकम यांनी सभास्थानावरून बाहेर पडल्यावर केले.

वळसे पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. देशात सर्वात कार्यक्षम मानल्या जाणाऱ्या भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या सभेत निकम यांच्या कार्यकर्त्यांनी अकारण राजकीय वळण दिले आणि गोंधळ घातला. या सगळ्यातून त्यांनी नेमके काय साधले असा सवाल करीत वळसे पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी कारखान्याचे नाव विनाकारण बदनाम झाल्याचा आक्षेप घेतला.

# शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन




चिखली (टाळगाव)/ पिंपरी

चिखली टाळगाव येथील एस एस पी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट च्या जी आय एस आणि सिनियर सेकंडरी विद्यालयात दिनांकः ५ रोजी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शैलेश कोथमिरे (निवृत्त प्रशासकीय अधिकारी, आयुक्त ) आणि अर्चना कोथमिरे, श्री. अशोक बोक्से श्री. जोशी सर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. शिक्षक दिनानिमित्त शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.


विद्यार्थ्यांनी शिक्षकांना शुभेच्छा देणारे शुभेच्छा पत्र, भाषण, गीते, व नृत्य सादर केली. यावेळी शाळेतील आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. जीआयएस प्ले स्कूलच्या - प्री प्रायमरी च्या सौ. शुभांगी माळी, सौ.दिपाली देशपांडे, प्रायमरी विभागातून स्मिता बोखरे, सेकंडरी विभाग श्री. दिपक शिंदे, सिद्धी कॉलेज ऑफ फार्मसीचे डिप्लोमा मधून कविता सानेर, डिग्री मधून श्रद्धा गायकवाड, लॅब असिस्टंट पल्लवी गाडे यांना सन्मानचिन्ह देऊन आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन श्री एस बी पाटील, विश्वस्त गणेश पाटील, सौ स्नेहल पाटील, . आकाश पाटील, प्रशासकीय अधिकारी . प्रकाश गायकवाड, सहयोगी संचालक . सुनील शेवाळे, 'सिद्धी कॉलेज ऑफ फार्मसी' चे प्राचार्य डॉ. प्रवीण कुमार साबळे, सतीश शेळके, दौलत कांबळे,मुख्याध्यापिका सौ शिल्पा गायकवाड, प्ले स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. भारती गडद, पर्यवेक्षिका सौ. माधुरी येवले, प्री प्रायमरी पर्यवेक्षिका सौ.विजयालक्ष्मी हाके, क्रीडा विभाग पर्यवेक्षक श्री विनोद जगदाळे व सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# विधानसभा निवडणुकीसाठी नितीन गडकरी भाजपचे विशेष प्रचारक

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत लोकसभा निवडणूक निकालाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी भारतीय जनता पक्ष काटेकोर प्रयत्न करत असून त्या अनुषंगाने या निवडणुकीचे विशेष प्रचारक म्हणून केंद्रातील कार्यक्षम मंत्री नितीन गडकरी यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि माजी खासदार रावसाहेब दानवे यांच्यावरही विशेष जबाबदारी असणार आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीला मोठा फटका सहन करावा लागला. विशेषतः भाजपचा प्रभाव असलेल्या विदर्भात काँग्रेसने तब्बल सात जागा मिळवल्या तर भाजपला दोन जागांवर समाधान मानावे लागले. एक जागा शिवसेना शिंदे गटाला मिळाली. राज्यभरातील लोकसभेचे ४८ जागांपैकी



महायुतीला केवळ १७ जागा मिळाल्या. लोकसभा निवडणूक निकालाची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत झाल्यास महायुतीला सत्तेतून उतार व्हावे लागेल हे निश्चित आहे. असे घडू नये यासाठी भाजपकडून आटोकाट प्रयत्न केले जात आहेत.

त्याचाच एक भाग म्हणजे विशेष प्रचारक म्हणून नितीन गडकरी राज्याचा कानाकोपरा पिंजून काढणार आहेत.

लवकरच विधानसभा निवडणुकांसाठी भाजपची निवडणूक व्यवस्थापन समिती जाहीर होणार असून रावसाहेब दानवे हे या समितीचे प्रमुख संयोजक असणार आहेत. या समितीत अशोक चव्हाण, नारायण राणे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, विजया रहाटकर, प्रवीण दरेकर, भाई गिरकर, अशोक नेते, अतुल सावे, संजय कुटे, जयकुमार रावल, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ यांचा समावेश केला जाणार आहे.

# ग्राहकांना दर्जेदार ताजी मिठाई विक्री करण्याचे आवाहन

**मुंबई :** गणेशोत्सवापाठोपाठ येणारा दसरा, दिवाळी व नाताळ सणाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन बृहन्मुंबई विभागीय कार्यालयामार्फत शुक्रवारी मिठाई , मावा उत्पादक व वितरकांची बैठक घेण्यात आली. ग्राहकांना दर्जेदार ताजी व सकस मिठाई विक्री करण्यात यावी, अन्न विषबाधेसारखा अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी काळजी घ्यावी असे आवाहन अन्न व औषध विभागाचे सह आयुक्त उल्हास इंगवले यांनी केले.

मिठाई खाल्याने विषबाधा होऊ नये म्हणून अन्नसुरक्षा कायदा व नियमानुसार या विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या परवाना अटींचे उल्लंघन न करण्याबाबत अन्न व्यवसायिकांना यावेळी सूचना देण्यात आल्या. यावेळी अन्न व औषध विभागाचे सह आयुक्त (मुख्यालय ) उल्हास इंगवले, सहाय्यक आयुक्त (अन्न),सचिन जाधव , गिरीश लिंबूरकर व महेश चौधरी, सह आयुक्त (अन्न ) यांनी मार्गदर्शन केले,

यावेळी मिठाई उत्पादक संघटनेचे अध्यक्ष प्रदीप जैन व इतर पदाधिकारी हे उपस्थित होते. तसेच अन्न व औषध कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (अन्न)आर डी पवार , ज्ञानेश्वर महाले ,अश्विनी रांजणे , नसरीन मुजावर व अन्नसुरक्षा अधिकारी एस एस सावंत आदीं उपस्थित होते.

# काळभोर येथे आधार कार्ड शिबिराचे आयोजन

**लोणी काळभोर :** आधार कार्ड हि सर्व सामान्य माणसाची गरज बनली असून आधार कार्ड शिवाय कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळत नाही. नागरिकांच्या आधार कार्ड मध्ये अनेक त्रुटी असल्याने त्यांना काही योजनांपासून वंचित राहत असून आधार दुरुस्ती साठी नागरिकांना वणवण फिरावे लागत असल्याने नागरिकांची गरज लक्षात घेवून भारतीय डाक पुणे शहर पूर्व विभाग व शिरूर हवेलीचे आमदार अशोक पवार यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी काळभोर गावातील व परिसरातील नागरिकांसाठी पंचायत समितीचे माजी



उपसभापती युगंधर उर्फ सनी काळभोर यांनी लोणी काळभोर येथे आधार कार्ड शिबिराचे आयोजन करून कौतुकास्पद काम केले आहे .

भारतीय डाक पुणे शहर पूर्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आधार कार्ड शिबिराचे उद्घाटन शिरूर हवेलीचे आमदार अशोक पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास काळभोर साधना बँकेची माजी चेअरमन सुभाष काळभोर, पंचायत समितीचे माजी उपसभापती युगंधर काळभोर ग्रामपंचायत सदस्य नागेश काळभोर चंद्रकांत काळभोर, ऋतीक काळभोर, संजय राखपसरे, मनोज उपाध्ये व नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार अशोक पवार म्हणाले कि पुढील काळात शिरूर हवेली मतदार संघात जिल्हा परिषद गटानुसार आमदार आपल्या दारी या कार्यक्रमाचे आयोजन करणार असून यामध्ये नागरिकाच्या असणाऱ्या समस्या यामध्ये रेशनिंग कार्ड ,महसूल विभाग ,भूमिअभिलेख, वन विभाग तसेच इतर काही शासकीय कामे असतील ती तातडीने सोडविण्याचे काम केली जाणार असल्याची माहिती आमदार अशोक पवार यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना दिली .

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# छत्रपती शिवरायांच्या सूरत लुटीच्या वक्तव्यावर देवेंद्र फडणवीसांचे स्पष्टीकरण

**मुंबई :** मागील काही दिवसांपासून छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे हा विषय चर्चेत आहे. राजकोटमध्ये घडलेल्या दुर्घटनेवरुन विरोधक आक्रमक झाले आहेत. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सूरत मोहिमेबाबत वक्तव्य केले. यावरुन पुन्हा एकदा विरोधकांनी टीकास्त्र डागले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली हे काँग्रेसने शिकवलं आहे. शिवरायांनी सूरत लुटली नव्हती, या आशयाचे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यामुळे जोरदार राजकारण रंगल्यानंतर आता फडणवीस यांनी या प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे.

एका वृत्तवाहिनीने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकोट किल्ल्यावर झालेल्या दुर्घटनेवर प्रतिक्रिया दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी माणूस, महाराष्ट्र आणि तमाम हिंदू समाजाचं अराध्य दैवत आहेत. ज्यावेळी आपल्या दैवताची मूर्ती भंगते त्यावेळी जेवढं दु:ख होतं तेवढंच दु:ख महाराष्ट्रातल्या जनतेला आणि शिवप्रेमींना राजकोटचा पुतळा पडल्याने झालं. यातला विषय इतकाच आहे की ज्या प्रकारे राजकारण करण्यात आलं ते दुर्दैवी आहे. पुतळ्या पडल्यानंतर फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्यात आले. मी विरोधी पक्षाकडे पाहतो तेव्हा त्यांना दु:ख किती झालं आणि राजकीय संधी किती साधली हा प्रश्न पडला. मला त्यात राजकीय संधीच दिसली.

फडणवीस यांनी सूरत लूट या संदर्भात केलेल्या विधानावर देखील स्पष्टीकरण दिले. तसेच यावरुन त्यांनी काँग्रेस पक्षाला देखील धारेवर धरले. फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली हे म्हणणं चुकीचं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरतेवर दोनदा स्वारी केली. अल्लाउद्दीन खिलजी जे करतो त्याला लुटली म्हणतात, अब्दाली, तैमूर लंग यांनी जे केलं त्याला लूट म्हणतात. महाराजांनी तिथल्या सामान्य माणसांना हात तरी लावला का? शिव इतिहासकारांनी माध्यमांना सांगितलं की महाराजांनी पत्र दिलं होतं मुघलांचा खजिना आहे, तुम्ही तीन वर्षे युद्ध चालवलं, त्यासाठी इतका खर्च आला. तुम्ही हा खर्च द्या अन्यथा मी स्वारी करेन. शिवरायांनी एक प्रकारे त्यांना नोटीसच पाठवली होती. खजिना वसूल केला, त्यानंतर महाराजांनी पावती दिली.



# अनिल कपूर यांना TIME100 -I यादीमध्ये अव्वल स्थान



अनिल कपूर यांनी ढखचए१०० -ख यादीमध्ये अव्वल स्थान निर्माण केलं असून -ख च्या जगात प्रभाव निर्माण करणाऱ्या विविध क्षेत्रातील १०० लोकांना यात सन्मानित केल आहे. बॉलीवूड अभिनेत्याने दिल्ली उच्च न्यायालयात -ख विरुद्ध ऐतिहासिक निकाल जिंकल्यानंतर या मेगास्टारने या यादीत स्थान मिळवलं. अनिल कपूर यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी खटला दाखल केला होता विशेषत: डिजिटल प्लॅटफॉर्मवरील कोणत्याही प्रकारच्या गैरवापरापासून त्यांचे नाव, प्रतिमा, समानता, आवाज आणि इतर वैयक्तिक गुणधर्मांना संरक्षण मिळावे यासाठी खटला दाखल केला होता. अनिल कपूर यांच्या साठी ही अभिमानाची गोष्ट आहे.

अभिनेत्याने प्रतिष्ठित यादीत स्वतःच स्थान हॉलिवूड अभिनेत्री स्कारलेट जोहानसन, गुगलचे सीईओ सुंदर पिचाई आणि इतरांसोबत शेअर केल आहे. यापूर्वी, सिनेमा आयकॉनने एका मुलाखतीत सांगितले होते की -ख तंत्रज्ञानाचा पूर्णपणे फायदा घेतला जाऊ शकतो आणि व्यावसायिकरित्या त्याचा गैरवापर केला जाऊ शकतो. तो म्हणाला की कोर्टाने त्याच्या बाजूने दिलेल्या आदेशामुळे त्याच्या वैयक्तिक गुणधर्मांचा गैरवापर करणाऱ्यावर खटला भरणे शक्य होते.

ही मोठी बातमी इंटरनेटवर पसरताच, सिनेमाच्या आयकॉनच्या चाहत्यांनी आणि चाहत्यांनी त्याचा नवीन पराक्रम साजरा केला. सध्या, अनिल कपूर त्याच्या पुढच्या थिएटर रिलीझ 'सुभेदार' साठी तयारी करत आहे, जे दिग्दर्शक सुरेश त्रिवेणी यांच्यासोबतचे पहिले सहकार्य आहे.

# तर जागतिक शांततेला धोका : रशियाचा अमेरिकेला इशारा

**मॉस्को :** रशिया युक्रेन युद्धात युक्रेनला शस्त्र पुरवठा करून आगीत तेल ओतण्याचे काम अमेरिका आणि पाश्चिमात्य राष्ट्रांनी थांबवले नाही तर जागतिक शांततेला धोका निर्माण होईल, असा इशारा रशियाने अमेरिका आणि पाश्चात्य देशांना दिला आहे. त्याचवेळी भारतासह चीन आणि ब्राझील हे देश युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्नशील असल्याबद्दल रशियाने त्यांचे कौतुकही केले आहे.

सुमारे दोन वर्षापासून रशिया आणि युक्रेन या देशांमध्ये तुंबळ युद्ध सुरू आहे. युद्ध सुरू झाले तेव्हा केवळ आठ ते पंधरा दिवसात रशिया युक्रेनला गिळंकृत करेल, असे मानले जात होते. मात्र, अमेरिका आणि पाश्चात्य राष्ट्रांनी युक्रेनला मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्र आणि आर्थिक रसद पुरविली. त्यामुळे युक्रेने केवळ तगच धरली नाही तर काही काळापूर्वी त्यांनी रशियाच्या भूप्रदेशावर आक्रमण करून कुर्स्क शहर ताब्यात घेतले. मागील काही काळापासून युक्रेन अधिक आक्रमक झाला असून या युद्धात रशियाचे अपरिमित नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर युक्रेनला सहकार्य करणाऱ्या अमेरिका आणि पाश्चात्य राष्ट्रांवर रशियाने आगपाखड केली आहे. युक्रेनला शस्त्र परवठा करण्याबाबतची मर्यादा अमेरिकेने केव्हाच ओलांडली आहे. त्यामुळे आम्ही अमेरिकेसंदर्भात पाळलेल्या संयमाची परीक्षा बघितली जात आहे. अमेरिकेने हेच उद्योग सुरू ठेवले तर त्याचे परिणाम केवळ अमेरिकेला अथवा पाश्चात्य देशांनाच नव्हे तर संपूर्ण जगाला भोगावे लागतील. अमेरिकेच्या या कृत्यांमुळे जागतिक शांतता धोक्यात येईल, असे रशियाने नमूद केले आहे.

तिसऱ्या वेळ भारताच्या पंतप्रधान पदावर विराजमान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी रशियाचा दौरा करून राष्ट्र प्रमुख व्लादिमीर पुतीन यांच्याशी चर्चा केली. त्याचप्रमाणे काही काळापूर्वी त्यांनी युक्रेनला भेट देऊन तेथील राष्ट्रप्रमुख व्लादिमीर झेलेंस्की यांच्याशी संवाद साधला. कोणत्याही समस्येतून तोडगा काढण्यासाठी युद्धाचा मार्ग उपयोगी ठरत नाही. त्यासाठी संवादाची गरज आहे, हे त्यांनी दोन्ही राष्ट्र प्रमुखांच्या निदर्शनास आणून दिले. भारताच्या या प्रयत्नांचे रशियाने कौतुक केले आहे. त्याचप्रमाणे चीन आणि ब्राझील या देशांनाही हे युद्ध संपुष्टात यावे, असे वाटत असून आपण या सहकाऱ्यांच्या सातत्याने संपर्कात आहोत, असेही रशियाने स्पष्ट केले आहे.

दीर्घकाळ लांबलेल्या या युद्धामुळे रशियाचे मोठे नुकसान झाले असले तरीही त्याहीपेक्षा अधिक मोठी किंमत देश म्हणून युक्रेनला मोजावी लागली आहे. या युद्धामुळे सुरुवातीला झेलेंस्की यांच्या पाठीशी असलेली युक्रेनची जनता आता युद्धाला कंटाळली आहे.

एकीकडे नागरिक युद्धामुळे हाल अपेष्टा सहन करत असताना झेलेंस्की अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर डोळा ठेवून युद्ध लांबवत असल्याची भावना नागरिकांमध्ये घर करू लागली आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक पार पडल्यानंतर त्या पदावर डोनाल्ड ट्रम्प निवडून आले तर युक्रेनला मिळणारी मदत बंद होण्याची शक्यता लक्षात घेऊन या निवडणुकीपूर्वी जेवढे मिळेल ते पदरात पाडून घ्यावे, या हेतूनेच झेलेनस्की यांनी सध्या अधिक आक्रमक भूमिका घेतली असल्याचेही सांगितले जात आहे.

# डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेसाठी १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई :** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत ''डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना'' सन २०२४-२५ मध्ये राबविण्यात येत आहे. राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत व मुंबई शहर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील म दरसांनी विहित अटी व शर्तीची पूर्तता करुन सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता विहित नमुन्यातील अर्जासह परिपुर्ण प्रस्ताव, जिल्हाधिकारी, मुंबई शहर, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांचेकडे १५ सप्टेंबर, २०२४ पर्यत सादर करावेत.

याबाबतचा अधिक तपशील महाराष्ट्र शासनाच्या https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मदरसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १५ सप्टेंबर, २०२४ आहे. यानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दि.१५ ऑक्टोबरपर्यत शासनास सादर करतील, अशी माहिती मुंबई शहरचे जिल्हा नियोजन अधिकारी जी.बी. सुपेकर यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

# तर अनुसूचित जाती जमाती समूह विखुरला जाईल : अण्णासाहेब कटारे



**मुंबई :** सर्वोच्य न्यायालयाच्या खंडपीठाने अनुसूचित जाती-जमाती मध्ये वर्गीकरण करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिल्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे अनुसूचित जाती-जमाती समूहामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे वाद होतील व अनुसूचित जाती जमाती समूह विखुरला जाईल असे मत राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

देशातील प्रस्थापित, सत्ताधारी व विरोधी पक्ष मागासवर्गीय मतांवर डोळा ठेवून राजकारण करतात मात्र निर्णयाबाबत ते मूग गिळून बसल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जाती-अनुसूचित जमातीची जनगणना झालेली नाही मग वर्गीकरण कशाच्या आधारावर होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे न्यायालयाने या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी अण्णासाहेब कटारे यांनी केली.

राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचा झंझावात संपूर्ण महाराष्ट्रात जोमाने सुरू आहे सर्व स्तरातील लोक राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षात दाखल होत आहे . मुंबईमध्ये पक्षाची ताकत भक्कमपणे उभी करण्यासाठी पक्षाने जुने जाणते रिपब्लिकन नेते अनंत पांचाळ यांची मुंबई प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली असून त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मुंबईमध्ये पक्ष बळकट होण्यास मदत होईल असा विश्वास कटारे यांनी अनंत पांचाळ यांच्या निवडी प्रसंगी केला.

# विघ्नहर्ता गणरायाच्या स्वागतासाठी शाहू नगरी सजली

**सातारा :** .शनिवारपासून सुरू होणाऱ्या आनंदोत्सव अर्थात घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवासाठी शुक्रवारी सातारकर यांची लगबग दिसून येत होती. सातारा शहरातील मोती चौक, राजवाडा परिसरात फळे, फुले ,पाने ,पत्री तसेच विविध प्रकारचे मोदक खरेदीसाठी सातारकरांची झुंबड उडाली होती. राजवाडा परिसरातील जनसेवा फ्रुट स्टॉलवर असलम बागवान यांनी देश-विदेशातील अनेक उत्कृष्ट प्रतीची फळे विक्रीसाठी उपलब्ध केली आहेत .बिगर मोसमी आंबाही या फळात दिसत असून सफरचंद, पेर ,डाळिंब, चिकू, चकुत्र, अननस, पपई ,स्वीट चिंच, च्यनामना, आलू बुखार याशिवाय देशी केळी, संत्री, मालटा, पेर ,पीच, चेरी अशी अनेक फळे विक्रीसाठी उपलब्ध झाली आहेत.

बाप्पाला आवडणाऱ्या माव्याच्या मोदकासोबतच स्ट्रॉबेरी ,गुलकंद, पिस्ता ,काजू ,बटरस्कॉच प्रकारचे साच्यात घातलेले मोदकही विक्रीसाठी उपलब्ध असून याला मोठी मागणी आहे .

तसेच शेवंती ,गुलाब, निशिगंध, चाफा ,झेंडू, बेंगलोर गुलाब आधी प्रकारच्या फुलांना मोठी मागणी असून हार आणि वेण्या खरेदीसाठीही सातारकरांची झुंबड उडाली आहे .

मोती चौक परिसरामध्ये पत्री ,कमळ ,केवडा, विड्याची पाने आधी पूजा साहित्यासाठी ही नागरिकांनी मोठी गर्दी केली होती रात्री उशिरापर्यंत या खरेदीसाठी तसेच पूजा साहित्यामध्ये केशर ,अष्टगंध, हळद कुंकू ,जानवी जोड, उदबत्ती, अत्तर, निरांजन वाती खरेदीसाठी ही मोठी गर्दी दिसून येत होती



फोटो.. अतुल देशपांडे, सातारा

# साताऱ्यात पीपल्स रिपब्लिकन आंदोलनाला सत्ताधारी व विरोधी आमदारांचा पाठिंबा

**सातारा :** सातारा : सातारा जिल्ह्यातील अवैद्य दारू, गुटखा, मटका, गांजा व जुगार विरोधात पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रमेश अनिल उबाळे यांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला वाढता पाठिंबा मिळत असून महायुतीचे आमदार महेश शिंदे व महाविकास आघाडीचे आमदार शशिकांत शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी पाठिंबा दिला आहे .सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्याशी संपर्क साधून तातडीने कारवाई करण्याची जोरदार मागणी केली.

सातारा जिल्ह्यातील अवैद्य धंदे मटका गुटका जुगार तसेच दरीत पद दलित व महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंदर्भात जिल्हा प्रशासन व पोलीस यंत्रणेला जागे करण्यासाठी पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चार दिवस लोकशाही मार्गाने आंदोलन होत आहे .वास्तविक पाहता सातारा बस स्थानक येथील पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आली. याच बस स्थानक शेजारी मटका व गांजा विक्री खुलेआम केली जाते. गुन्हेगारी वाढलेली आहे. पोलीस यंत्रणा कागदपत्रे कारवाई करते. सकाळी धाड आणि दुपारी पुन्हा ते धंदे सुरू होतात. हे राहट गाडगे सुरूच आहे. कारवाई केली असे पोलीस सांगतात .पण काहींची हफ्तेबाजी राजरोसपणाने सुरूच आहे. याबाबत उत्तर देत नाहीत. यामुळे सत्ताधारी लोकप्रतिनिधीला सुद्धा कारवाईची मागणी करावी लागते. त्यामुळे निवडणुकीच्या पूर्व काही काळ हे बेकायदेशीर धंदे बंद करावे .अशी सत्ताधारी आमदारांची मागणी आहे तर दुसऱ्या बाजूला विरोधी पक्षाच्या आमदारांनी ही अनधिकृत धंदे व मटका जुगार आणि अमली पदार्थ विक्रीवर अंकुश ठेवण्यासाठी एकमत केले आहे. आता पोलीस यंत्रणेने कर्तव्य दक्षता दाखवून हे धंदे बंद करावे. अशी जोरदार मागणी या निमित्त होत असून पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्री रमेश उबाळे जिल्हा अध्यक्ष युवराज कांबळे, नितीन रोकडे ,बाबुराव चव्हाण, संदीप कांबळे, नितीन शिंदे यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पैलवान अनिल जाधव, पैलवान सागर साळुंखे, सामाजिक कार्यकर्ते संतोष जाधव, गौरव जाधव, शिवसेनेचे हनुमंतराव चवरे ,आर.पी.आय.चे अशोक गायकवाड, संजय गाडे, धर्मवीर युवा मंच अमोल खोपडे, पँथर सेनेचे आदित्य गायकवाड, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे विजय बोबडे सामाजिक कार्यकर्ते संग्राम बर्गे , भीमशक्तीचे अरुण पवार, अमर गायकवाड आदी मान्यवरांनी पाठिंबा दिला आहे.





पूजा साहित्यामध्ये केशर ,अष्टगंध, हळद कुंकू, जानवी जोड, उदबत्ती, अत्तर, निरांजन वाती खरेदीसाठी ही मोठी गर्दी (फोटो.. अतुल देशपांडे, सातारा)

# अनेक शिवसैनिक व सामाजिक कार्यकर्ते मनसेत दाखल

**मुंबई:** शिवसेना ठाकरे गटाचे युवा सेना नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे प्रतिनिधित्व करीत असलेल्या वरळी विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ठाकरे गटाला खिंडार पाडले आहे. ठाकरे गटातील अनेक नेते व शिवसैनिक यांच्यासह आतापर्यंत राजकारणापासून दूर असलेले सामाजिक कार्यकर्तेही मनसेत दाखल झाले आहेत.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या उपस्थितीत वरळीतील अनेक शिवसैनिकांनी मनसेमध्ये प्रवेश केला. ठाकरे गटाचे उपनेते मनोज जामसुतकर यांचे निकवर्तीय अमित मटकर आणि हरीश जावळेकर यांनी देखील ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करून मनसेचा झेंडा हाती घेतला आहे. त्यांच्यासह त्यांचे शेकडो कार्यकर्ते आणि वरळीतील नागरिक यांनी देखील मनसेत प्रवेश केला आहे.

आतापर्यंत कोणत्याही राजकीय पक्षात सहभागी नसलेल्या मात्र, सामाजिक कार्यात आघाडीवर असलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी मनसेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे काम करता येईल, असा विश्वास व्यक्त केल्यामुळे त्यांना देखील पक्षात प्रवेश देण्यात आला आहे, अशी माहिती पक्षाचे सरचिटणीस आणि वरळी विधानसभा मतदारसंघात आदित्य ठाकरे यांच्या विरोधात रिंगणात उतरणारे उमेदवार संदीप कुलकर्णी यांनी दिली. या विधानसभा निवडणुकीत मनसे २०० ते २२५ जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहे. राज ठाकरे यांनी नुकताच महाराष्ट्राचा दौरा केला असून या दौऱ्यादरम्यान त्यांनी उमेदवारांची चाचपणी केली आहे. काही ठिकाणचे उमेदवार देखील ठाकरे यांनी आपल्या दौऱ्यात जाहीर केले आहेत.

# श्री गणरायाच्या मिरवणुकीत झळकले व्यापाऱ्यांच्या निषेधाचे फलक



## खणआळीमध्ये खरेदी न करण्याचा कार्यकर्त्यांचा इशारा

**सातारा** : राजपथावरून वारंवार निघणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मिरवणुकांमुळे राजपथावरील व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्याबाबतचे निवेदन त्यांनी पोलीस यंत्रणेला सादर केले होते या प्रकरणाचा गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गुरुवारी निषेध केला. सायंकाळी तालीम संघ मैदानावरून गणेशोत्सव मिरवणुकीमध्ये कार्यकर्त्यांनी यापुढे खण आळी येथे खरेदी करणार नाही तसेच दसरा दिवाळीमध्ये उपाशीपोटी राहणाऱ्या व्यापाऱ्यांना गणेशोत्सवात तरी कळ काढा अशा उपरोधिक निषेधाचे फळक झळकवले.

सातारा शहरामध्ये श्री गणरायाच्या आगमनाला केवळ २४ तास शिल्लक राहिले आहेत .मात्र सातारा शहरातील गणेशोत्सव मंडळांची संख्या लक्षात घेता बहुतांश मंडळांनी गेल्या आठवडाभरापासून श्री गणराया मिरवणुकीचे सत्र आरंभले होते. त्यामुळे राजपथावर वारंवार वाहतुकीची कोंडी होत होती. यासंदर्भात राजपथावरील व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निवेदनाद्वारे नाराजी व्यक्त केली सातारा शहरात गुरुवारी सायंकाळी राजपाथावरील व्यापाऱ्यांच्या निषेधाचे फलक झळकले. तालीम संघ मैदानाजवळ काही गणेश भक्तांनी हे फलक झळकवत व्यापाऱ्यांच्या या नाराजीचा निषेध व्यक्त केला यापुढे खणआळी येथे कोणतीही खरेदी करणार नाही त्यावर बहिष्कार असेल असा इशारा चक्क गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दिला या फलकांनी सातारकरांचे लक्ष वेधून घेतले

ऐन गणेशोत्सवामध्ये गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते आणि राजपथावरील व्यापारी आमने-सामने आले आहेत मात्र तरीही पोलीस अधीक्षक समीर शेख आणि त्यांची पोलीस यंत्रणा सतर्क आहे हा प्रश्न सामंजस्याने सोडवला जावा अशी अपेक्षा सातारकर व्यक्त करत आहेत.

# पानवेलींच्या गर्दीत हरवले मोती तळे

## वृक्ष विभागाच्या ठेकेदाराच्या झोपा, कर्मचाऱ्यांची टाळाटाळ





**सातारा** : ऐतिहासिक मोती तलावाचा परिसर पानवेलींनी झाकला गेला असून त्यामुळे येथे अस्वच्छता वाढली आहे. लोकप्रतिनिधी खासदार उदयनराजे भोसले यांच्या निवासस्थानासमोरील या परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य असून यावेलींचे निर्मूलन करणे गरजेचे असताना वृक्ष विभागाचे आळमटळम सुरू आहे. प्रशासनाने नेमलेल्या ठेकेदाराचे या कामाकडे अक्षम्य दुर्लक्ष असून याबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सातारा शहराची शुक्रवार पेठ ही खासदार उदयनराजे भोसले यांचे जलमंदिर, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे सुरुची निवासस्थानामुळे राजकीय दृष्ट्या महत्त्वाची आहे. याच दोन्ही निवासस्थानाच्या मधोमध मरीआई मातेच्या मंदिरासमोर ऐतिहासिक मोती तळे आहे. या तळ्याच्या समोर प्रतापसिंह भाजी मंडई कडून येणारा मोठा ओढा आहे. या मोती तळ्याला सध्या पानवेलींनी ग्रासले आहे. या पानवेली मुळापासून काढण्यासाठी सध्या वृक्ष विभागाला वेळ नाही. या विभागाचे प्रमुख सुधीर चव्हाण हे कार्यक्षम अधिकारी आहेत त्यांच्या नेतृत्वाखाली या विभागाचा कारभार सुधारलेला आहे प्रस्ताव प्राप्त वृक्ष छाटणीचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याचे निर्मूलन काही दिवसातच होत असल्याने पालिका प्रशासनाचा झपाटा दिसून येतो. मात्र वृक्ष विभागाने नेमलेले ठेकेदार झोपा काढत असल्याची चर्चा आहे. बऱ्याच ठिकाणच्या पानवेली अनावश्यक गवत काढणे गरजेचे असताना शुक्रवार पेठेमध्ये अस्वच्छतेची बजबजपुरी वाढली आहे. ठेक्यावरचे सफाई कामगार नक्की काय काम करतात हे समजायला मार्ग नाही. ढोर गल्ली येथील हा ठेकेदार राजकीय प्रभावातूनच पुढे आलेला आहे. सातारा पालिकेत सोम्या गोम्याच्या नावाने टेंडर भरून त्याचे लाभ उठवण्याची जुनी परंपरा आहे मात्र त्या नादात शहरातील सार्वजनिक स्वच्छतेचे काम मार खाऊ लागले आहे. जलमंदिर समोरील पानवेली काढण्यासाठी वारंवार लोकप्रतिनिधींच्या कार्यकर्त्यांनी वेळोवेळी सूचना देऊनही हे काम अद्याप झालेले नाही यामुळे प्रशासक अभिजीत बापट यांचा प्रशासनावर वचक नाही काय? अशी चर्चा या निमित्ताने सुरू झाली आहे. वृक्ष विभागाचे कर्मचारी संपूर्ण आठ तासाच्या सेवेमध्ये वृक्ष तोडणीची जुजबी कामे करून तेथून गायब होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यांच्यावर लक्ष ठेवणारी स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांचे फावले आहे. या विभागाचे प्रमुख अभियंता सुधीर चव्हाण यांनी या प्रकाराला आळा घालून ठेकेदाराची हजेरी घ्यावी आणि त्याला कडक शब्दात समज द्यावी अशी मागणी होत आहे.

# नितीन पाटील यांनी घेतली मराठीत शपथ

## दिल्ली येथील संसद भवनात शपथविधी



**सातारा** : सातारा जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन खा. नितीन पाटील यांची महाराष्ट्रात राज्यसभा सदस्यपदी निवड झाल्यानंतर, त्यांचा आज दिल्ली येथील संसद भवनात शपथविधी झाला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी त्यांना शपथ दिली. त्यांनी मराठी भाषेतून शपथ घेतली.

महायुतीतून राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षातर्फे सातारा जिल्हा बँकेचे चेअरमन, आ. मकरंद पाटील यांचे बंधू नितीन पाटील यांनी राज्यसभेवर संधी मिळाली आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा प्रचारावेळी नितीन पाटील यांना खासदार करण्याचा शब्द दिला होता. तो शब्द अजित पवार यांनी पाळला. भाजपचे खा. पियूष गोयल यांच्या रिक्त पदावर नितीन पाटील यांनी संधी देण्यात आली आहे. राज्यसभा निवडणुकीची प्रक्रिया ३ सप्टेंबरला पूर्ण झाली. त्यानंतर आज नवनियुक्त खासदारांचा शपथविधी झाला.

**साताऱ्यासह महाराष्ट्रातील जनतेच्या हिताच्या कामासाठी प्राधान्य देणार आहे. राज्यसभेवर संधी दिल्याबद्दल राष्ट्रवादीचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच राष्ट्रवादीसह महायुतीतील नेत्यांचे आभारी आहे. राज्यसभेच्या माध्यमातून देशाच्या सेवेसाठी सदैव, पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहे.**
**- खा. नितीन पाटील**

## जुगार प्रकरणी तिघांवर कारवाई

सातारा : सातारा शहर परिसरात जुगार प्रकरणी तिघांवर शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, राजवाडा परिसरात गुलाब यासीन आत्तार (वय ६१, रा. गडकरआळी, सातारा) याच्याकडून पोलिसांनी रोख १२०० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. दुसरी कारवाई सौरभ चंद्रकांत भिसे (वय २३, रा.बुधवार पेठ, सातारा) याच्यावर करण्यात आली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून रोख १४४० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

तिसरी कारवाई दिलीपकुमार त्र्यंबक नाफड (वय ७०, रा. मंगळवार पेठ, सातारा) याच्यावर करुन रोख १२०० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

# जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख यांची बदली रद्द

सातारा : राज्याच्या गृह विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या पोलीस दलातील भारतीय सेवेतील आयपीएस १७ पोलीस अधिक्षकांच्या बदल्या काही दिवसांपूर्वी करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये साताऱ्याचे पोलीस अधिक्षक समीर शेख यांची उपायुक्त मुंबई शहर येथे बदली करण्यात आली होती. या आदेशानंतर अवघ्या दोन तासातच या बदलीला स्थगीती मिळाली. आज गुरुवार, दि. ५ सप्टेंबर रोजी पोलीस अधिक्षक समीर शेख यांची बदली अधिकृतरित्या रद्द करण्यात आल्याचे सहसचिव व्यंकटेश भट यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

काही दिवसांपूर्वी राज्यातील १७ पोलीस अधिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये ठाणे येथील पोलीस उपआयुक्त सुधाकर पठारे यांची साताऱ्याचे पोलीस अधिक्षक म्हणून नियुक्तीबाबत नाव होते. अन साताऱ्याचे एसपी समीर शेख यांची मुंबई शहर उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली होती. मात्र,या बदलीनंतर काही तासातच पुन्हा एक आदेशाचे पत्र साताऱ्याचे एसपी समीर शेख यांना देण्यात आले. त्यानुसार पुढील आदेश येईपर्यंत नियुक्तीचे ठिकाण सोडण्यात येवू नये, असे सांगितले.

सुधाकर पठारे यांची आता बृहन्मुंबई पोलीस उपआयुक्तपदी बदली करण्यात आल्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे साताऱ्याचे एस. पी. समीर शेख यांची बदली मुंबई येथे करण्यात आलेली बदली रद्द करण्यात असून समीर शेख हेच साताऱ्याचे पोलीस अधिक्षक म्हणुन कार्यभार सांभाळतील असे, सहसचिव व्यंकटेश भट यांनी या आदेशाद्वारे सांगितले आहे.

# सोयाबीनला उच्चतम भाव देण्याची भारतीय किसान संघाची निवेदनाद्वारे मागणी

**वडूज** : अहोरात्र काबाड कष्ट करून ही सरकार दरबारी कायम अदखल पात्र असलेल्या शेतकरी अन्न दात्याला किमान सणासुदीच्या काळात तरी त्याच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित मूल्य भाव मिळून त्याचा घामा सार्थकी लागावा अथवा शासनाने बोनस स्वरूपात शेतकऱ्यांना लाभ द्यावा, अशा आशयाचं निवेदन भारतीय किसान संघाच्या खटाव तालुका शाखेच्या वतीने तहसीलदार बाई माने यांना देण्यात आलं.

महाराष्ट्रात सोयाबीन हे क्र. २ चे मुख्य नगदी पीक आहे. राज्यात यावर्षी सुमारे ५० लाख हेक्टर क्षेत्र या पीकाखाली आहे. राज्याची सरासरी उत्पादकता हेक्टरी १४.५६ क्विंटल आहे. राज्याचा सरासरी उत्पादन खर्च ६०३९ रु.प्रति क्विंटल आहे. त्या अनुशंगाने राज्य सरकारने उ-उझ (कृषि लागत एवं मुल्य आयोग) कडे प्रती क्विंटल ६९४५/- दर दिला जावा अशी शिफारस केली आहे, ती रास्त आणि योग्य आहे. म्हणून आम्ही समस्त शेतकरी चालू हंगामात सोयाबीन ला ६९४५/- रू. क्विंटल दर द्यावा अशी मागणी करत आहोत. बाजारात यावर्षी सोयाबीन खरेदीदारानी संघटीत प्रयत्नातुन दरावर नियंत्रण ठेवुन दर साडेचार हजार च्या वर जावू दिले नाहीत. अश्या परिस्थितीत जर शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर लाभकारी किंमत मिळत नसेल तर राज्य सरकारने भावांतर पद्धतीने किंवा बोनस च्या माध्यमातून फरक देण्याची व्यवस्था करावी. निसर्गाच्या प्रकोपाने अतीवृष्टी, किड रोग या कारणाने सरासरी उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी हे सण तोंडावर आहेत. उत्पादन खर्चावर आधारित लाभकारी किंमत अथवा नुकसान भरपाई घामाचे दाम अन्नदात्याला मिळून हे सणासुदीचे दिवस सुखाचे जावे ही अपेक्षा आहे. आपण लाडक्या बहिणीचा विचार केलात तसा लाडक्या शेतकरी दादाचा पण निश्चित विचार करून निश्चितचं भाव वाढ कराल अशी आशा असल्याचंनिवेदनात म्हटलं आहे. सदर निवेदन हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आलं आहे.

तालुका अध्यक्ष माजी मुख्याध्यापक सुरेश औटे जिल्हा कोषाध्यक्ष विनायक ठिगळे,जिल्हा कार्यकारणी सदस्य गजाननराव फडतरे, तालुका उपाध्यक्ष आनंदराव इनामदार ,तालुका मंत्री नामदेवराव राऊत आदींच्या हस्ते हे निवेदन देण्यात आलं.

यावेळी सातेवाडीचे युवा नेते विक्रम रोमण, वाकेश्वर ग्रामपंचायतचे कार्यकारी सदस्य अमर फडतरे, लालासाहेब माने आदींची उपस्थिती होती.

# ज्ञानदीपचे सामाजिक दायित्व मोठे : शेळके

**खंडाळा** : सभासदांच्या हिताला प्राधान्य देत ज्ञानदीपने चांगली प्रगती साधली असून या संस्थेचे सामाजिक दायित्व मोठे असल्याचे प्रतिपादन खंडाळ्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शेळके यांनी खंडाळा येथे बोलताना केले.

ज्ञानदीप को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा ४६ वा वर्धापन दिन खंडाळा येथील विभागीय कार्यालयात उत्साहात पार पडला.यावेळी पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे डॉ. सुरेश पवार,खंडाळा साखर कारखान्याचे संचालक चंद्रकांत ढमाळ, विभागीय व्यवस्थापक दत्तात्रय नावडकर, शाखाधिकारी संदीप जगताप,विभागीय वसुली अधिकारी सचिन पोळ,किरण पवार,प्रा.एस.वाय.पवार,प्रकाश यादव, सुधाकर गाढवे,उदय गाढवे,निशा सूर्यवंशी, प्रा.जगन्नाथ विभुते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्री.शेळके म्हणाले की, ज्ञानदीप संस्थेने सामाजिक हित लक्षात घेऊन कोविड काळात मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ५० लाखांची मदत याबरोबर समाज उपयोगी काम करित आहे.सर्व सभासदांनी संस्थेवर टाकलेला विश्वास, संचालक मंडळाचे पाठबळ, कर्मचाऱ्यांची कार्यकुशलता यामुळे संस्था महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकवर राहिली आहे. ज्ञानदीप ही संस्था सहकार क्षेत्रात अग्रगण्य संस्था असून तिचा आर्थिक पाया मजबूत आहे.

# सातारा जिल्ह्यात पुन्हा अपुऱ्या बस सेवेचा फटका मुंबईला शंभर बसेस रवाना

**सातारा** : मुंबईतील कोकणस्थ चाकरमान यांना गणपतीसाठी गावाला जाण्यासाठी मुंबई ठाणे पालघर या तीन आजारासाठी राज्य शासनाने जादा पाच हजार बसेस सोडण्याचा निर्णय घेतला होता त्याकरता सातारा आकारातून ११० बसेस रवाना झाल्याने ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर सातारा जिल्ह्याची जिल्हाअंतर्गत सेवा काही प्रमाणात विस्कळीत झाली. लांब पल्ल्याच्या सेवा व जिल्हा अंतर्गत वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने प्रवाशांचे हाल झाले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतून कोकणात गणपतीसाठी जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी ५ हजार बसेसचे जादा नियोजन केले आहे या बसेस दिनांक ३ तारखेपासून ८ तारखेपर्यंत सोडल्या जाणार आहेत या बसेसचे ४० टक्के आरक्षण यापूर्वीच झाले असून बाकीच्या बसेस सुद्धा ठाणे पालघर मुंबई पनवेल या आगारातून कोकणाच्या दिशेने धावणार आहेत सातारा आजाराच्या ४५९ बसेस पैकी १०० बसेस मुंबईला नुकत्याच रवाना करण्यात आल्या दोन दिवसापूर्वी झालेल्या एसटी कामगारांच्या संपामुळे आधीच सातारा आजाराला सुमारे ४० ते ४५ लाख रुपयांचा फटका बसला कराड वाई वडूज महाबळेश्वर येथील जिल्हा अंतर्गत बस सेवा ठप्प झाल्या होत्या आता कोकणातच प्रवाशांसाठी बस गेल्यामुळे काही मार्गावरच्या बसेस सातारा आजाराला रद्द कराव्या लागल्या मात्र याबाबतच्या माहितीला विभाग नियंत्रकांनी पुष्टी दिली नाही सातारा शहर बस स्थानकाच्या बाहेर वडूज दहिवडी कोरेगाव मसवड गोंदवले तसेच परळी खोऱ्यात जाणाऱ्या काही मार्गावर दुपारी तीन च्या नंतर अजिबात बस जाऊ शकली नाही या फेऱ्यांचे नियोजन रद्द झाल्याचे सौजन्य आगार व्यवस्थापकांनी न दाखवल्याने प्रवाशांना भलताच मनस्ताप झाला मात्र या बस सेवा रद्द झाल्याचे उशिरा जाहीर करण्यात आले तोपर्यंत प्रवासी आगार सोडून खाजगी वाहनाने मुक्कामासाठी रवाना झाले होते यामध्ये विद्यार्थ्यांचे हाल झाले विद्यार्थ्यांना खाजगी वडापणे शाळा सुटल्यानंतर घरी परतावे लागले याबाबत विभाग नियंत्रक रोहन पलंगे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांचा फोन नेहमीप्रमाणे स्विच ऑफ होता.

# कास फुलोत्सव हंगामाला सुरुवात






**कास** : जागतिक वारसास्थळ असणाऱ्या कास फुलोत्सवाची पर्वणी आता पर्यटकांसाठी खुली झाली असून पर्यटकांना वेगवेगळ्या टप्प्यात विविध नैसर्गिक रंगीबेरंगी फुले पाहता येणार आहेत. कास पठारावरील फुलांच्या हंगामाचे उद्घाटन गुरुवारी साताऱ्याच्या उपवनसंरक्षक अदिती भारद्वाज यांच्या हस्ते झाले.

पर्यटकांना वेगवेगळ्या टप्प्यात विविध नैसर्गिक रंगीबेरंगी फुले पाहता येणार आहेत. संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करायची आहे. प्रति पर्यटक १५० रुपये पर्यटन शुल्क व शालेय विद्यार्थ्यांसाठी ४० रुपये शुल्क आकारले जाणार असून विद्यार्थ्यांनी सोमवार ते शुक्रवार यायचे आहे. तसेच सोबत महाविद्यालय प्राचार्यांचे पत्र आवश्यक आहे. १२ वर्षांखालील मुलांना मोफत प्रवेश आहे. ऑनलाइन बुकिंगसाठी ु.ज्ञरी.ळपव.ळप या संकेतस्थळावर पर्यटकांना नोंदणी करावी लागणार आहे.

कास पठार कार्यकारी समितीकडून हंगाम सुरू करणे बाबतचे सर्व नियोजन पूर्ण झाले असून यावर्षी हंगामासाठी साधारणत: १३० स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. प्रशस्त पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. पर्यटकांसाठी बसेसची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

पठारावर फुले पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना स्वच्छतागृह, पिण्यासाठी मिनरल वॉटर, विश्रांतीसाठी सहा नैसर्गिक झोपड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करावा लागणार नाही. कास पठारावर सद्यस्थितीत गेंद, सीतेची आसवे, सोनकी, चवर, टोपली, कारवी, भारांगी, धनगरी फेटा, तुतारी यांसह अनेक प्रजातींची फुले फुलायला सुरुवात झाली असून येत्या काही दिवसात पोषक वातावरणानुसार फुलांचे गालीचे तयार व्हायला देखील सुरुवात होणार आहे. त्यामुळे कास पठारावर फुले पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना फुलांच्या बहराचा मनसोक्त आनंद घेता येईल. अशी माहिती कास पठार कार्यकारी समितीचे अध्यक्ष दत्तात्रय किर्दत यांनी दिली. उद्घाटन कार्यक्रमावेळी सहाय्यक वनसंरक्षक प्रदीप रौधाळ, तहसीलदार हनमंत कोळेकर, नायब तहसीलदार संजय बैलकर, वनक्षेत्रपाल हनमंत गमरे, कास समितीचे अध्यक्ष दत्तात्रय किर्दत, उपाध्यक्ष प्रदीप कदम, समितीचे सदस्य सोमनाथ जाधव, ज्ञानेश्वर आखाडे, विठ्ठल कदम आदी मान्यवर उपस्थित होते.